# पर्यटन संचालनालय(DoT), महाराष्ट्र शासन

मुख्यालय : नरीमन भवन, १५६/१५७, १५वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-२१
दूरध्वनी क्र.९१-२२-६९१०७६००, ९१-२२-६९१०७६०४
ई-मेल – connect.dot-mh@gov.in

दि. 03 APR 2023 /9323

प्रति,
कार्यकारी अभियंता,
भातसा धरण व्यवस्थापन विभाग,
भातसानगर,ठाणे

विषय - **ठाणे जिल्ह्यातील भातसा धरण व नाशिक जिल्ह्यातील अप्पर वैतरणा धरण परिसरात पर्यटकांना मुलभुत सोयीसुविधा निर्माण करणेबाबत.**

संदर्भ -
१. उपसंचालक, पर्यटन संचालनालय, नाशिक यांचे पत्र जा क्र पसं/ उपसंना/ विकासकामे/२०२३/४० दि-२७/०१/२०२३
२. संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई यांचे पत्र जा क्र प सं/विकास/बांधकाम/भातसा धरण/८०० दि-२८/०२/२०२३
३. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश यांचे पत्र जा क्र मुअ/जसंविकोप्र/तां-८/पर्यटन/१०६० दि- २८/०३/२०२३
४. आपले कार्यालयाचे पत्र जा क्र भाधव्यवि/प्रशा-४/८३१/२०२३ दि – २९/०३/२०२३

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन ठाणे जिल्ह्यातील भातसा धरण व नाशिक जिल्ह्यातील अप्पर वैतरणा धरण परिसरात पर्यटकांना मुलभुत सोयीसुविधा निर्माण करणेकरिता ना हरकत मिळणेबाबत संदर्भिय पत्र क्र १ व २ अन्वये विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट ४२ अ क्र २९ म.सा.बां.वि नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र २४७ व २४८ च्या अधीन राहुन व धरण सुरक्षिततेचे संबधित सर्व प्रचलित शासन निर्णयाचे पालन करुन ना हरकत देण्याची कार्यवाही करणेबाबत सुचित करण्यात आल्याचे संदर्भिय पत्र क्र ३ नुसार दिसुन येत आहे. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांचे मार्फ़त संदर्भिय पत्र क्र ४ अन्वये भातसा व वैतरणा धरण परिसरात करण्यात येणा-या कामांचा आराखडा व सामंजस्य करार मसुदा सादर करणेस विनंती करण्यात आली आहे. पर्यटन संचालनालय मार्फ़त वैतरणा व भातसा धरणा परिसरात पर्यटकांसाठी करण्यात येणा-या मुलभुत सोयी सुविधा चा आराखडा व सामंजस्य करार मसुदा सोबत सादर करण्यात येत आहे.

(डॉ. बी. एन. पाटील भा.प्र.से)
संचालक
पर्यटन संचालनालय

सोबत –
१. भातसा व वैतरणा धरण स्थळी पुरविण्यात येणा-या सोयी सुविधा चा आराखडा
२. सामंजस्य करार मसुदा

प्रत : 1) उपसंचालक, विभागीय कार्यालय, नाशिक यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
2) उपसंचालक, विभागीय कार्यालय, कोकण यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner

**भातसा धरण परिसरात पर्यटकांना पुरविण्यात येणा-या मुलभुत सोयी सुविधांचा आराखडा**

भातसा व चोरणा नदीच्या संगमावर मौजे साजिवली, ता.शहापूर येथे भातसा धरण बांधण्यात आले आहे. भातसा प्रकल्प हा ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील मोठा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या धरणामुळे निर्माण झालेल्या एकत्रित जलाशयाची उपयुक्त साठा क्षमता ९४२.१० द.ल.घ.मी. इतकी आहे. भातसा प्रकल्पाचे ठिकाण हे निसर्गरम्य असुन नाशिक, मुंबई व ठाणे ह्या शहरांपासुन साधारणत: ८०-१०० किमी चे अंतरावर तसेच मध्य रेल्वेच्या आटगाव स्थानकापासुन १५ किमी अंतरावर असल्याकारणाने पर्यटक, नागरिक ह्यांचा वावर सदर परिसरात दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसुन येत आहे. त्यास अनुसरुन पर्यटकांकरिता खालील प्रमाणे सोयी सुविधा पर्यटन संचालनालयामार्फ़त निर्माण करण्याचे विचाराधीन आहे.

१. विश्रामगृह परिसरात बागबगीचा –
भातसा धरण परिसरात पुर्वा विश्रामगृहाचे बांधकाम करण्यात आले असुन सदर विश्रामगृह २५-३० वर्ष जुने आहे. सदर विश्रामगृह परिसरातुन धरणाचे नयनरम्य दृश्य पर्यटकांस पाहवयास मिळते. विश्रामगृहाच्या आजुबाजुचे परिसरात मोकळी जागा असुन सदर जागेत बागबगीचा निर्मान केल्यास पर्यटकांना वावरण्यास चांगली जागा मिळु शकते व सदर ठिकाणी बसुन पर्यटका धरणाचे विहंगम दृश्य अनुभवु शकतात.

२. विद्युत रोषनाई, -
विश्रामगृह परिसरात निर्माण करण्यात आलेल्या बागबगीचेत पर्यटकांकरिता रंगीबेरंगी आकर्षक संगीत व विद्युत रोषनाई (Sound and light show) निर्माण करणेचे विचाराधीन आहे जेणेकरुन धरणाचे नयनरम्य दृश्य पर्यटकांस संध्याकाळचे वेळी अनुभवता येईल.

३. सिसीटिव्ही कॅमेरे –
भातसा धरण स्थळी पावसाळा कालावधीत सांडव्यावरुन सोडलेल्या पाण्याचे दृश्य अनुभवन्याकरिता मुंबई, नाशिक ह्या लगतच्या शहरामधुन पर्यटकांची गर्दी जमते. सदर गर्दीचे वेळी पर्यटकांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने विश्रामगृह व धरण परिसरात सिसीटिव्ही कॅमेरे बसविण्याची बाब विचारात घेण्यात आलेली आहे

४. वाहनतळ व प्रसाधनगृह उभारणी -
भातसा धरण स्थळी येणारे पर्यटक खाजगी वाहनाने धरणस्थळास भेट देतात. भेटी वेळी पर्यटकांमार्फ़त आणण्यात येणा-या गाड्यांची योग्य जागी सुरक्षित पार्किंग करणेकरिता वाहनतळाची उभारणी करणे विचारात घेण्यात आले आहे. तसेच विश्रामगृह परिसरात पर्यटकांकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय करणेबाबत विचारात घेण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

५. दिशा व माहितीदर्शक फ़लक –

पर्यटकांच्या सोयीच्या दृष्टीने धरण व विश्रामगृह परिसरात, धरणास जाणा-या रस्त्याच्या दोन्ही बाजुने, महामार्गाच्या दुतर्फ़ा माहिती दर्शक फ़लक लावण्याची बाब विचारात घेण्यात आली आहे.

६. बगीचा परिसरात सेल्फ़ी प्वॉईंट व आसनव्यवस्था विकसित करणे –

विश्रामगृह परिसरात निर्माण करण्यात येणा-या बगीचा परिसरात पर्यटकांना वेळ घालविण्यासाठी आकर्षक आसनव्यवस्था , Gazeboo व सेल्फ़ी प्वॉईंट उभारण्यात येणार आहे.

७. विश्रामगृह परिसरात सोलार पॅनल बसविणे

भातसा धरण परिसर दुर्गम भागात येत असल्याने पावसाळा कालावधीत वेळोवेळी वीज पुरवठा खंडित होत असल्याचे दिसुन येत आहे. त्या दृष्टीने पर्यटकांकरिता विश्रामगृह परिसरातील विद्युत पुरवठा सुरळित राहणेकरिता तसेच बगीचा परिसरातील रंगीबेरंगी रोषणाई अखंडित सुरु राहणेचे दृष्टीने सोलार पॅनल बसविण्यात येणार आहे.

८. नदी किनारी घाट बांधणे –

भातसा धरणाच्या अधो बाजुस धरण भिंतीपासुन अंदाजे ५५० मी अंतरावर पर्यटक उन्हाळयाचे वेळी थंडगार पाण्याचा अनुभव घेणेकरिता नदीपात्रात उतरत असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि नदी पात्रात उतरुन पाण्याचा आनंद घेणेकरिता योग्य व्यवस्था नसल्याने पर्यटकांस दुर्घटनेचा सामना करावा लागल्याचे निदर्शनास आले आहे. त्या दृष्टीने नदी पात्रात ३० मी लांबीचा घाट तसेच घाट परिसरात रोषणाई , आसनव्यवस्था, घाटाचे बाजुने लोखंडी रेलिंग इ बाबी निर्माण करणेचे विचारात घेण्यात आले आहे.

उपरोक्त नमुद बाबी सदर परिसरात निर्माण केल्याच पर्यटनास चालना मिळून धरण स्थळास व विश्रामगृहास भेट देणारे अधिकारी/ कर्मचारी , लोकप्रतिनिधी तसेच शहरातुन येणारे पर्यटक यांस आल्हाददायक वातावरण व धरणस्थळाचे नयनरम्य दृश्य अनुभवयास मिळु शकते.

स्थळ प्रत मा . संचालक यांनी मान्य केली आहे

(आकाश अं. चकोर)
कार्यकारी अभियंता
पर्यटन संचालनालय, मुंबई

Scanned with CamScanner

## वैतरणा धरण परिसरात पर्यटकांना पुरविण्यात येणा-या मुलभुत सोयी सुविधांचा आराखडा

वैतरणा जलविद्युत प्रकल्प हा नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील जलविद्युत निर्मिती व पाणी पुरवठा प्रकल्प आहे. सदर प्रकल्पांतर्गत वैतरणा नदीवर वैतरणा धरण, अळवंडी धरण व डावा कटक बांध धरण अशी 3 धरणे बांधण्यात आलेली आहेत. या तीनही धरणामुळे निर्माण झालेल्या एकत्रित जलाशयाची उपयुक्त साठा क्षमता 331.31 द.ल.घ.मी. इतकी असून सन 1973 पासून 100 टक्के साठा करण्यात येत आहे. वैतरणा प्रकल्पाचे ठिकाण हे निसर्गरम्य असुन नाशिक, मुंबई व ठाणे ह्या शहरांपासुन साधारणत: १००- १५० किमी चे अंतरावर असल्याकारणाने पर्यटक, नागरिक ह्यांचा वावर सदर परिसरात दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसुन येत आहे. त्यास अनुसरुन पर्यटकांकरिता खालील प्रमाणे सोयी सुविधा पर्यटन संचालनालयामार्फ़त निर्माण करण्याचे विचाराधीन आहे.

१. विश्रामगृह परिसरात बागबगीचा –

वैतरणा धरण परिसरात विश्रामगृहाचे बांधकाम करण्यात आले असुन सदर विश्रामगृह २०-३० वर्ष जुने आहे. सदर विश्रामगृह परिसरातुन Backwater चे नयनरम्य दृश्य पर्यटकांस पाहवयास मिळते. विश्रामगृहाच्या परिसरात Backwater च्या समोरील बाजूस मोकळी जागा असुन सदर जागेत बागबगीचा व Walkway निर्माण केल्यास पर्यटकांना वावरण्यास चांगली जागा मिळु शकते व सदर ठिकाणी बसुन पर्यटक Backwater चे विहंगम दृश्य अनुभवु शकतात.

२. विद्युत रोषनाई -

विश्रामगृह परिसरात निर्माण करण्यात आलेल्या बागबगीचेत तसेच Backwater परिसरात पर्यटकांकरिता रंगीबेरंगी आकर्षक संगीत व विद्युत रोषनाई (Sound and light show) निर्माण करणेचे विचाराधीन आहे जेणेकरुन पर्यटकांस Backwater चे नयनरम्य दृश्य अनुभवता येईल.

३. सिसीटिव्ही कॅमेरे –

वैतरणा धरण स्थळी पावसाळा कालावधीत सांडव्यावरुन सोडलेल्या पाण्याचे दृश्य अनुभवन्याकरिता मुंबई, नाशिक ह्या लगतच्या शहरामधुन पर्यटकांची गर्दी जमते. सदर गर्दीचे वेळी पर्यटकांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने विश्रामगृह व धरण परिसरात सिसीटिव्ही कॅमेरे बसविण्याची बाब विचारात घेण्यात आलेली आहे

४. वाहनतळ व प्रसाधनगृह उभारणी -

वैतरणा धरण स्थळी येणारे पर्यटक खाजगी वाहनाने धरणस्थळास भेट देतात. भेटी वेळी पर्यटकांमार्फ़त आणण्यात येणा-या गाड्यांची योग्य जागी सुरक्षित पार्किंग करणेकरिता वाहनतळाची उभारणी करणे विचारात घेण्यात आले आहे. तसेच विश्रामगृह परिसरात पर्यटकांकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय करणेबाबत विचारात घेण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

५. दिशा व माहितीदर्शक फ़लक –

पर्यटकांच्या सोयीच्या दृष्टीने धरण व विश्रामगृह परिसरात, धरणास जाणा-या रस्त्याच्या दोन्ही बाजुने, मुंबई महामार्गाच्या दुतर्फ़ा माहिती दर्शक फ़लक लावण्याची बाब विचारात घेण्यात आली आहे.

६. बगीचा परिसरात सेल्फ़ी प्वॉईंट व आसनव्यवस्था विकसित करणे –

विश्रामगृह परिसरात निर्माण करण्यात येणा-या बगीचा परिसरात पर्यटकांना वेळ घालविण्यासाठी आकर्षक आसनव्यवस्था , Gazeboo व सेल्फ़ी प्वॉईंट उभारण्यात येणार आहे.

७. विश्रामगृह परिसरात सोलार पॅनल, स्प्रीन्क्लेर वसविणे

वैतरणा धरण परिसर दुर्गम भागात येत असल्याने पावसाळा कालावधीत वेळोवेळी वीज पुरवठा खंडित होत असल्याचे दिसुन येत आहे. त्या दृष्टीने पर्यटकांकरिता विश्रामगृह परिसरातील विद्युत पुरवठा सुरळित राहणेकरिता तसेच बगीचा परिसरातील रंगीबेरंगी रोषणाई अखंडित सुरु राहणेचे दृष्टीने सोलार पॅनल बसविण्यात येणार आहे. तसेच बागबगीचा करीता drip irrigation sprinklers बसविणेची बाब विचारात घेण्यात आली आहे.

उपरोक्त नमुद बाबी सदर परिसरात निर्माण केल्याच पर्यटनास चालना मिळून धरण स्थळास व विश्रामगृहास भेट देणारे अधिकारी/ कर्मचारी , लोकप्रतिनिधी तसेच शहरातुन येणारे पर्यटक यांस आल्हाददायक वातावरण व धरणस्थळाचे नयनरम्य दृश्य अनुभवयास मिळु शकते.

स्थळ प्रत मा . संचालक यांनी मान्य केली आहे

(आकाश अ. चकोर)
कार्यकारी अभियंता
पर्यटन संचालनालय, मुंबई

Scanned with CamScanner